MHKO120000932014

<u>नियमित दिवाणी दावा क्र. २२/२०१४</u>

<u>निशाणी क्र. १ वरील आदेश</u>

<u>(बाळू वि. शांताराम)</u>

प्रस्तुत प्रकरण हे आज रोजी वादी ने पुरावा देणेवर नेमले आहे. सदरचे प्रकरण हे १० वर्ष जुने आहे.

२. आज सकाळच्या सत्रामध्ये वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञ न्यायालयात हजर होते. प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी वादीने पुरावा दिलेला नाही, याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. त्यानुसार वादीचे विद्वान विधीज्ञ यांनी पुरावा देणेकामी मुदतीचा अर्ज न्यायालयात हजर करीत आहे असा तोंडी युक्तीवाद केला.

३. दुपारच्या सत्रापर्यंत वादी तर्फे मुदतीचा अर्ज आला नाही. वादी व त्यांचे विद्वान विधीज्ञ यांना दुपारच्या सत्रामध्ये वारंवार पुकारले असता ते गैरहजर राहिले. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मागील ब-याच तारखांना वादीतर्फे वारंवार पुरावा देणेकामी मुदतीचा अर्ज दिला असून न्यायालयाने ते अर्ज कॉस्टसह मंजूर करुन वादीला शेवटची संधी दिल्याचे दिसून येते. सदर प्रकरण हे १० वर्ष जुने आहे. तसेच, आदरणीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी जुनी प्रकरणे लवकरात-लवकर निर्गत करणेबाबत निर्देश दिले असल्याने सदर प्रकरण प्राधान्याने चालविणे गरजेचे आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

सदर प्रकरणात वादीचा पुरावा बंद करणेत येतो. तसेच, प्रकरण प्रतिवादीचे पुराव्यावर लावणेत यावे.

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE
Date: 2025.09.23 10:44:33 +0530

**(नि. दि. रुद्रभटे)**

**दिनांक :** २२/०९/२०२५

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
गोरगोटी